# दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत

डॉ. भैय्यासाहेब गायकवाड — विषय विशेषज्ञ (किटकशास्त्र)
डॉ. दिप्ती पाटगावकर — कार्यक्रम समन्वयक
डॉ. हनुमान गरुड — विषय विशेषज्ञ
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, खामगाव

दशपर्णी अर्क हे उत्तम प्रतीचे नैसर्गिक किडनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होऊ शकतो. याचा उपयोग सेंद्रिय शेतीमध्ये केला जातो. यात दहा प्रकारच्या पानांचा अर्क वापरला जातो. रासायनिक किटकनाशकांचा वापर केल्यास ते आरोग्यास खूप हानिकारक आहे.त्यामुळे जर आरोग्यावर होणारे वाईट परिणाम वशेतीचा खर्च कमी करण्यासाठी नक्कीच सर्व शेतकऱ्यांनी या दशपर्णी अर्काचा वापर किटकनाशक म्हणून केला पाहिजे. भारत सरकारच्या किटकनाशक बंदी कायद्यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांनी हे जैविक किटकनाशक स्वत: तयार करावे.

### दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी लागणारी वेगवेगळ्या दहा झाडाची पाने:

कडूलिंब पाला ५ किलो, रुई, एरंड, गुळवेल, निरगुडी, घाणेरी, लाल कन्हेरी, करंज, सिताफळ, पपई इत्यादींचा पाला प्रत्येकी २ किलो.

### साहित्य:

टाकी २०० लिटर, गायीचे शेण २ किलो, गोमुत्र ५ लिटर.

### कृती:

- यापैकी कडूनिंब, रुई करंजी, सिताफळ पाला महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच २ किलो तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, पाव किलो लसूण ठेचा, २ किलो गावरान गायीचे शेण आणि गोमुत्र ५ लिटर हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून गोनपाठाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी दोन वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोनपाठाने झाकून ठेवणे. असे हे मिश्रण ३० दिवस ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण गाळून घ्यावे व १६ लिटर पाण्याला २०० मिली फवारणीसाठी वापरावे.
- किटकनाशक: मावा, तुडतुडे, फुलकिडे, पहिल्या दोन अवस्थेतील अळ्या यांच्यावर प्रभावी काम करते. याची फवारणी शक्यतो दर आठ दिवसाला करावी.

### दशपर्णी अर्काचे फायदे:

- . दशपर्णी अर्काचे शेतीत खूप महत्वाचे स्थान आहे दशपर्णीमुळे सर्व प्रकारच्या किडी व पहिल्या अवस्थेतील अळ्या यांच्या नियंत्रणा साठी उपयुक्त आहे.
- दशपर्णी अर्क फवारणी मुळे लहान अळ्या, रसशोषक किड, किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते.
- उग्र वासामुळे किडी पिकामध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात.
- दशपर्णीमुळे मुळाची वाढ जोमदार होते व पानाची काळोखी आणि पाने जड होतात.
- रासायनिक किटकनाशकांचा वापर कमी झाल्याने पिकावर किटनाशकांचे अंश राहत नाहीत.
- मित्रकिडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होण्यास वाव मिळतो.
- पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेतीमालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळू शकतो.

### दशपर्णी अर्कचा वापर:

दशपर्णी अर्क तयार केल्यापासून तीन महिन्यापर्यंत वापरता येतो फक्त तो बंध झाकणाच्या कॅन मध्ये व्यवस्थित ठेवावा.

### दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत:


वेगवेगळ्या दहा झाडाची पाने


पानाचे मोजमाप


मोजमाप केलेली पाने


प्लास्टिक ड्रम मध्ये सडविण्यासाठी टाकते वेळेस


प्लास्टिक ड्रम मध्ये ३० दिवस ठेवणे


३० दिवसानंतर गाळून घेणे

★ ★ ★

(संपर्क: +९१ )